लोकमत

# शिवांजली विद्यानिकेतनमध्ये सायबर सुरक्षा मार्गदर्शन

लोकमत न्यूज नेटवर्क

**आळेफाटा :** शिवांजली विद्यानिकेतन, चाळकवाडी येथे 'सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा' अभियानांतर्गत बाळासाहेब जाधव महाविद्यालयाच्या बीसीए आणि बीसीएस विभागातील विद्यार्थ्यांनी इयत्ता पाचवी ते दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी सायबर सुरक्षाविषयक मार्गदर्शन शिबिराचे आयोजन केले.

या शिबिरात विद्यार्थ्यांना सायबर सुरक्षेचे महत्त्व आणि मोबाइल व इंटरनेट वापरताना सायबर सुरक्षिततेसाठी घ्यावयाची काळजी याबाबत सविस्तर माहिती देण्यात आली. यावेळी शिक्षक अशोक कुऱ्हाडे, संतोष चव्हाण व प्रशांत शेटे उपस्थित होते. मुख्याध्यापक भानुदास चासकर यांनी सांगितले की, फाउंडेशनच्या माध्यमातून बाळासाहेब जाधव महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांना सायबर सुरक्षाविषयक जागरूकता पोहोचवण्याची संधी प्राप्त झाली. त्यांनी फाउंडेशन व महाविद्यालयाचे आभार मानले. शिबिरात क्लब ऑफिसर साक्षी नेहरकर, शोएब शेख, मोहिनी जगताप व ऋतू नेहरकर यांनी समन्वयक म्हणून जबाबदारी पार पाडली, सायबर ओरियर्स म्हणून बुशरा पटेल, फरीन सस्ते आणि आकांक्षा कोकाटे यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. आयोजन बंडू सदामते, विष्णू बोरसे, अण्णासाहेब घुले, चंद्रकांत साळवे आणि महेश कुऱ्हाडे यांनी केले.




सायबर सुरक्षाविषयक मार्गदर्शन करताना जाधव महाविद्यालयाच्या विद्यार्थिनी.